**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र. पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३ मुंबई, दि.०५/०६/२०२३

विषय:- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँक/ वित्तीय संस्थामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत.

******

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय गृह विभाग क्र.बियुडी-०९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दि.१४/१०/२०२२ अन्वये राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्जव्यवस्था करण्याबाबत दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना पुन्हा सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुंषगाने बँक ऑफ इंडिया या बँकेकडून कर्ज घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे अर्ज सॉफ्टवेअरमध्ये भरण्यात आले आहेत. परंतु त्यांना अद्याप घर बांधणी अग्रिम मंजूर करण्यात आले नाही. त्यांच्या कागदपत्राची माहिती खालील मुद्यांच्या अनुषंगाने संबंधीत विभाग/कार्यालय प्रमुख यांनी प्रमाणीत करुन देणे आवश्यक आहे.

i) पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता अर्ज सादर केले आहेत, त्यांनी नोंदणीकृत गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इ. कागदपत्रांची पूर्तता केली असल्याचे तसेच कार्यालयाचे ताब्यात सुरक्षित असल्याचे प्रमाणित करावे.

ii) पोलीस गृहनिर्माण महामंडळाला मुद्दल/ व्याज वसुलीची रक्कम वेळेवर परत करण्याची जबाबदारी या कार्यालयाची आहे. तसेच या कार्यालयाद्वारे पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयास दरमहा एकूण वसुलीचा अहवाल पत्राद्वारे न चुकता पाठविण्यात येईल, असे प्रमाणित करण्यात यावे.

iii) संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर केल्यानंतर त्यांच्या पगारातून मासिक हप्ता कापून घेण्यास आणि कर्जाची रक्कम व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत मासिक हप्त्याची रक्कम पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडे जमा करण्यासाठी अग्रिमधारकाचे संमतीपत्र संबंधित घटक कार्यालय यांचेकडे जमा केले आहे, असे प्रमाणित करावे.

iv) घरबांधणी अग्रिम घेतलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम व्याजासहित परतफेड केल्यास संपूर्ण कर्ज व्याजासहीत परतफेड केले असल्याचे पोलीस महासंचलाक कार्यालया महाराष्ट्र राज्य यांनी खात्री करुन तसे पोलीस गृहनिर्माण महामंळास कळविल्याशिवाय नोंदणीकृत गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इत्यादी कागदपत्रे संबंधित अग्रिमधारकास परत केली जाणार नाहीत, असे प्रमाणित करण्यात यावे.

v) शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसुल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचाऱ्याने शिल्लक रक्कम महामंडळास त्वरीत एकररकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर/ सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याने सदर घर/ सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून उर्वरीत मुद्दल / व्याजाची वसूली करुन महामंडळास भरण करण्यात येईल, असे प्रमाणित करावे.

vi) घरबांधणी अग्रिम करीता अर्ज सादर केलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/ विनियम, दि.०२.०२.२०२१ मधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याची घटक कार्यालय/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्री केली असल्याचे प्रमाणित करावे.

vii) अग्रिमधारकास मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे, त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/ विनियम, दि.०२/०२/२०२१ मधील अटी व शर्तींची पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात येईल, असे प्रमाणित करावे.

खालील पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणी व्यक्तीश: लक्ष घालुन त्याचे कार्यालयाचे प्रमाणपत्र या कार्यालयास **दि.०७/०६/२०२३** पर्यंत न चूकता (desk३१.dgoffice@ mahapolice

.gov.in) या ईमेलवर पाठवावे, ही विनंती. तसेच सदरची माहिती **या कार्यालयास वेळेत प्राप्त न झाल्यास बँकेकडून मिळणारे घरबांधणी अग्रिमाचे कर्ज प्राप्त होणार नाही, याची नोंद घ्यावी.**

05/06/23

**( निसार तांबोली)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य. मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुबई
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचलाक, अर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य. मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नवी मुंबई
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर/ नवी मुंबई/ नाशिक शहर/ ठाणे शहर/ पिंपरी चिंचवड/ नागपूर शहर/ अमरावती शहर/ पुणे शहर/ औरंगाबाद शहर/ मिरा-भाईदर-वसई-विरार
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई
पोलीस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग,कल्याण/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
पोलीस अधीक्षक, रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ सातारा/ कोल्हापूर/ सोलापूर ग्रा./ नाशिक ग्रा./ धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ बीड/ उस्मानाबाद/ सांगली/ लातूर/ परभणी/ हिंगोली/ नांदेड/ जालना/ पालघर/ वर्धा/ अकोला/ यवतमाळ/ भंडारा/ गोंदिया/ नागपूर ग्रा./ गडचिरोली/ वाशिम/ चंद्रपूर/ ठाणे ग्रा./ अमरावती ग्रा./बुलडाणा/ पुणे ग्रा./औरंगाबाद ग्रा.
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे/ नागपूर/औरंगाबाद
पोलीस अधीक्षक, लाचलुपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण व प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर
समादेशक, राज्य राखवी पोली गट क्र.१/२/३/४/५/६/७/८/९/ १०/११/१२/१३/१४/१५/१६
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना/ अकोला/ बाभळगांव-लातूर/ तुरची सांगली/ नानवीज दौंड/ मरोळ-मुंबई/ नागपूर/ खंडाळा
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण, केंद्र, नागपूर/UCTC- मुंबई
समादेशक, राज्य अपत्ती प्रतीसाद दल, धुळे/ नागपूर/
उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती/ कोल्हापूर/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/नांदेड/ पुणे

## प्रमाणपत्र

शासन निर्णय गृह विभाग क्र.बियुडी-९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दि.१४/१०/२०२२ अन्वये राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्जव्यवस्था करण्याबाबत दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना पुन्हा सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेसाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांना नोडल एजन्सी म्हणून नेमण्यस मान्यता देण्यात आली आहे.

गृह विभाग पत्र क्र.बीयुडी-०६२१/प्र.क्र.१६०/आस्था-१, दि.१९/०४/२०२३ अन्वये, राज्यातील पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची घरबांधणी अग्रिमाकरीता घरबांधणी अग्रिम समितीने शिफारस केल्याप्रमाणे सद्यस्थितीत सुमारे रु.१००० कोटीचे नवीन कर्ज उभारणीबाबत बँक ऑफ इंडिया यांच्या प्रस्तावास आणि व्याज आकारणीचा प्रकार तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे व्याजदरात वारंवार बदल होत असल्याने कर्ज उभारणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लागू झालेल्या फ्लोटिंग व्याजदराच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सध्यास्थितीत बँक ऑफ इंडिया यांचा व्याजदर फ्लोटिंग ८.६०% (वार्षिक वैधता ) असल्याचे बँकेने महामंडळास कळविले आहे.

बँक ऑफ इंडिया यांचे मार्फत नवीन कर्ज उभारणीसाठी --------------(कार्यालयाचे नाव नमूद करावे)या कार्यालयातर्फे खालीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१. वरील अनुषंगाने या कार्यालयामार्फत असे प्रमाणित करण्यात येते की, प्राप्त झालेल्या घर बांधणी अग्रिम योजनेकरीता पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे एकूण--------अर्जासाठी रु.----------- इतक्या रकमेची मागणी पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करण्यात आली आहे. (सोबत यादी जोडली आहे.)(टिप:- यादीवर घटक प्रमुखांची पदनामासह स्वाक्षरी करावी.)

२. घरबांधणी अग्रिमाकरीता अर्ज केलेल्या सर्व पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी नोंदणीकृत गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इत्यादी कागदपत्रांची पूर्तता केली आहे, सदर कागदपत्रे या कार्यालयाच्या ताब्यात सुरक्षित आहेत.

३. पोलीस गृहनिर्माण महामंडळाला मुद्दल/ व्याज वसुलीची रक्कम वेळेवर परत करण्याची जबाबदारी या कार्यालयाची आहे. तसेच या कार्यालयाद्वारे पोलीस महासंचालक यांच कार्यालयास दरमहा एकूण वसुलीचा अहवाल पत्राद्वारे न चुकता पाठविण्यात येईल

४. प्रत्येक कर्जदार पोलीस अधिकारी/ अंमलदाराकडून त्यांच्या पगारातून मासिक हप्ता कापून घेण्यास आणि कर्जाची रक्कम व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत मासिक हप्त्याची रक्कम पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडे जमा करण्यासाठी अग्रिमधारकाचे संमतीपत्र कार्यालयाकडे जमा केले आहे.

५. घरबांधणी अग्रिम घेतलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम व्याजासहित परतफेड केल्यास संपूर्ण कर्ज व्याजासहीत परतफेड केले असल्याचे पोलीस महासंचलाक कार्यालया महाराष्ट्र राज्य यांनी खात्री करुन तसे पोलीस गृहनिर्माण महामंळास कळविल्याशिवाय नोंदणीकृत गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इत्यादी कागदपत्रे संबंधित अग्रिमधारकास परत केली जाणार नाहीत

६. शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसुल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचाऱ्याने शिल्लक रक्कम महामंडळास त्वरीत एकररकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर/ सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याने सदर घर/ सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून उर्वरीत मुद्दल / व्याजाची वसूली करुन महामंडळास भरणा करण्यात येईल.

७. घरबांधणी अग्रिम घेतलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/ २०१९/विनियम, दि.०२.०२.२०२१ मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता केली असल्याची घटक कार्यालय/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्री केली आहे.

८. अग्रिमधारकास मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे, त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/ विनियम, दि.०२/०२/२०२१ मधील अटी व शर्तीची पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात येईल.

**संबंधीत कार्यालय प्रमुखाची पदनामासह स्वाक्षरी**
(पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक)